# श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळ

१६५१, सदाशिव पेठ, टिळक स्मारक मंदिर, पुणे ३०. (स्थापना - १८९५)

पत्रव्यवहाराचा पत्ता - १३६०, शुक्रवार पेठ, भारत-भवन ब, पुणे ४११००२.
नोंदणी क्र. - एफ ५२

संस्थापक
लोकमान्य टिळक

अध्यक्ष
श्री. रघुजीराजे आंग्रे

उपाध्यक्ष
श्री. दीपक टिळक
श्री. त्रिंबक पुरोहित

सरकार्यवाह
श्री. पांडुरंग बलकवडे

कार्यवाह
श्री. सुधीर थोरात
ए-७, विनीत सोसायटी,
कोथरुड, पुणे ४११०३८
फोन : ९४२२०१६५३९

**राज्याभिषेक शक ३५१**

दि. ०२ ऑगस्ट २०२४

**आदरणीय अध्यक्ष / सचिव / प्राचार्य / मुख्याध्यापक**

---

**विषय - शिवचरित्र स्पर्धा ०८ फेब्रुवारी २०२५**

श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळाची स्थापना **लोकमान्य टिळकांनी** १८९५ साली केली. तेव्हापासून १२८ वर्षे मंडळ किल्ले रायगडावर शिवपुण्यतिथी अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करीत आहे. **१९२६ साली मंडळाच्याच प्रयत्नाने किल्ले रायगडावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीचा जीर्णोद्धार करण्यात आला.**

शिवचरित्राच्या प्रसारासाठी मंडळ अनेक उपक्रम करीत असते. **याचाच एक भाग म्हणून मंडळाने ०८ फेब्रुवारी २०२५ रोजी इ. ७ वी आणि त्यापुढील सर्व शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी शिवचरित्रावर आधारित स्पर्धा आयोजित केली आहे.** या स्पर्धेसाठी मंडळाने १) शिवचरित्राचे अभ्यासक डॉ. केदार फाळके यांचे **'छत्रपती शिवाजीमहाराज'** २) ज्येष्ठ इतिहास संशोधक श्री. पांडुरंग बलकवडे, इतिहास अभ्यासक श्री. सुधीर थोरात व श्री. मोहन शेटे यांनी लेखन केलेले **'स्वराज्यरक्षणाचा लढा'** ३) ज्येष्ठ इतिहास संशोधक श्री. पांडुरंग बलकवडे, इतिहास अभ्यासक श्री. सुधीर थोरात यांनी लेखन केलेले **'अठराव्या शतकातील हिंदवी साम्राज्य'** या गंथांची निर्मिती केली असून पहिल्या दोन ग्रंथांच्या वयोगटाला रु. २००/- आणि तिसऱ्या ग्रंथाच्या वयोगटाला रु. २५०/- इतके शुल्क देऊन स्पर्धेत भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या वयोगटाप्रमाणे हे ग्रंथ मोफत दिले जातील. स्पर्धेतील विजेत्यांना रोख पारितोषिके तसेच सर्व सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्रे दिली जातील.

**आपल्या संस्थेतील मान्यवर पदाधिकाऱ्यांची भेट घेऊन आम्ही त्यांना स्पर्धेची सविस्तर माहिती सांगू इच्छितो. तरी आपल्या संस्थेतील इ. ७ वी आणि त्यापुढील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी स्पर्धेत भाग घेण्यासाठी आपण प्रोत्साहन द्यावे आणि शिवचरित्राचा प्रसार करण्यास सहकार्य करावे ही विनंती.** धन्यवाद.

आपला नम्र,

**रघुजीराजे आंग्रे**

अध्यक्ष, श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळ